## सेस फंड योजना

50 % अनुदानावर संकरीत गायी खरेदी

•पशुपालकांमध्ये संकरीत गायी जोपासण्याची आवड निर्माण करणे व त्यांचे दुग्ध उत्पादनात वाढ होऊन आर्थिक फायदा होईल.
•लाभ धारक पशुपालक असावा. योजना 50 % अनुदान राहील. लाभधारकाने गायीचा विमा उतरविणे बंधन कारक राहिल. सदर योजनेस 33 % महिलांचा सहभाग असावा.

50 % अनुदानावर सुधारीत जातीच्या म्हशींचे वाटप

सुधारीत जातीच्या म्हशी पालनासयाठी प्रोत्साहन देणे व सुधारीत जातीच्या म्हशीची जोपासना करणेसाठी पशुपालकांमध्ये आवड निर्माण करणे व सुधारीत जातीच्या म्हशी पालनामुळे दुग्ध उत्पादनात वाढ होऊन आर्थिक फायदा होईल.

•लाभ धारक पशुपालक असावा. योजना 50 % अनुदान राहील. लाभधारकाने म्हशींचा विमा उतरविणे बंधन कारक राहिल. सदर योजनेस 33 % महिलांचा सहभाग असावा.

अपंगाकरिता 100 % अनुदानावर 2 दुधाळ म्हशींचे गट वाटप

सुधारीत जातीच्या म्हशी पालनासाठी प्रोत्साहन देणे व सुधारीत जातीच्या म्हशींची जोपासना करणेसाठी अपंग पशुपालकांमध्ये आवड निर्माण करणे व सुधारीत जातींच्या म्हशी पालनामुळे दुग्ध उत्पादनात वाढ होऊन आर्थिक फायदा होईल. अपंगाकरिता रोजगार निर्माण होईल.

•लाभ धारक 40 % व त्याहून अधिक अपंग पशुपालक असावा. योजना 100 % अनुदान राहिल. लाभधारकाने म्हशींचा विमा उतरविणे बंधन कारक राहील. सदर योजनेस 33 % महिलांचा सहभाग असावा.

90 % अनुदानाने चिकन/मटन स्टॉल धारकांना सुविधा पुरविणे.

•चिकन/मटन स्टॉल धारकाकडून तांत्रिक दृष्टया स्वच्छ चिकन/मटन पुरविण्याकरिता त्यांना साहित्य व उपकरणे पुरवठा करणे.
•त्यांच्या कडे व्यवसायासाठी पुरेशी जागा, विद्युत पुरवठा असावा.

60 % अनुदानाने तबेले धारकांना (पशुपालकांना) दुग्ध व्यवसाय फायदेशीर होण्याच्या दृष्टीने सुविधा पुरविणे.

दुग्धजन्य पदार्थ तयार करण्याकरिता आवश्यक ती उपकरणे व साहित्य पुरविणे तसेच शुध्द दुधनिर्मिती करणे करीता साहित्य पुरविणे.

- तबेला धारकांनी जिल्हा परिषदेकडे नोंदणी करुन परवाना शुल्क भरणे. तसेच त्याच्या कडे किमान 10 दुधाळ जनावरे असावीत.

## वार्षिक योजना

•**बिगर अदिवासी सर्व साधारण योजना :** सवसार्धारण पशुवैदयकिय दवाखान्याचे / पशुप्रथमोपचार केंद्राचे बांधकाम करणे. पशुवैदयकिय दवाखान्यांना औषध पुरवठा, एकात्मिक कुक्कुट विकास कार्यक्रम , वैरण व पश्खादय विकास

•**अदिवासी उप योजना :** पशुवैदयकिय दवाखाना पशुप्रथमोपचार केंद्रासाठी इमारत बांधणे, आदिवासींच्या जनावरांना जीवरक्षक औषधांचा पुरवठा, दुभत्या जनावरांचा पुरवठा, अनु जमातीच्या कुटुंबाना शेळ्या मेंढ्यांचे वाटप करणे , दुभत्या जनावरांना खाद्य पुरवठा

•**विशेष घटक योजना :** अनु जाती /नवबौध्द लाभार्थिंर्ना दुधाळ जनावरांचे गटवाटप, अनु जाती /नवबौध्द लाभार्थिंर्ना दुधाळ जनावरांचे वाटप (खादय वाटप ), अनु जाती /नवबौध्द लाभार्थिंर्ना शेळयांचे गट वाटप, अनु जाती /नवबौध्द लाभार्थिंर्ना पशुसंवर्धन विषयक प्रशिक्षण